# घर तुमचं खूप काही सांगत असतं!

## मिती आणि निर्मिती

● केतन गाडगीळ



घरातला फोन ट्रिंगट्रिंगला आणि थोड्याच वेळात पाहुणे येताहेत असं कळलं की, घरातल्या मंडळींची पसारा आवरण्यासाठी लगबग सुरू होते. दारातच पडलेला चपलांचा ढीग, सकाळी वाचून झाल्यावर सोफ्यावर, डाइनिंग टेबलवर पसरलेली पेपरची पानं आणि पुरवण्या, बेडरूममधली अंथरुणं-पांघरुणं, घरातच वा बाहेर बाल्कनीत लटकणारे ओले/वाळलेले कपडे इथपासून ते अगदी किचनमध्ये ओट्यावर पडलेल्या भांड्यांच्या पसाऱ्यापर्यंत सारं काही भराभर दिसणार नाही अशा ठिकाणी ढकलण्याची घाई होते.

हे चित्र तुमच्या-आमच्या सगळ्यांच्याच घरात कायमच दिसणार आहे. घरात असलेला हा पसाराच खरं तर घराला जिवंतपणा आणतो. पण या पसाऱ्याबाबत कितीही उदार धोरण असलं तरीही प्रत्येकालाच आपलं घर नीटनेटकं असावं, देखणं-प्रसन्न दिसावं असं अगदी मनापासून वाटत असतं.

आपल्याला रोजच्या दैनंदिनीत लागणाऱ्या वस्तू व्यवस्थित जागच्या जागी ठेवता याव्यात, त्या तशाच नीट राहाव्यात आणि पाहिजे त्यावेळी मिळाव्यात अशी किमान अपेक्षा प्रत्येकाचीच असते. ती अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण घरात आपल्या गरजेनुसार वेगवेगळ्या सोयी करून घेतो. त्या सोयी पाहुण्यांना दर्शनी भागात चांगल्या पद्धतीने दिसतील यासाठी निरनिराळ्या रंगांचा वापर, वेगवेगळ्या टेक्स्चर्सचा वापर आपण करत असतो आणि त्यातूनच आकाराला येते आपल्या घराची अंतर्रचना.

पूर्वी घरातील फडताळात पितळेच्या स्वच्छ घासलेल्या डब्यांची रांग, भांड्यांच्या उंचीनुसार केलेला मांडणीतील फरक, शेणानं सारवलेल्या जमिनीवर ती सारवत असतानाच बोटांनी तयार होणारा पॅटर्न, बैठकीवर घातलेला



भरतकाम केलेला पलंगपोस, घरातल्याच ताईनं केलेली शंखशिंपल्यांची फ्रेम अशी त्या घरातल्या स्त्रीनेच केलेली अंतर्रचना प्रत्येक घराचं 'घरपण', नीटनेटकेपण जपत असे.

जसजसा काळ बदलला तशा आपल्या गरजाही बदलल्या. आपल्या रोजच्या धावपळीच्या दैनंदिनीत घरी परतल्यावर एकप्रकारचा फ्रेश लुक आपल्याला प्रसन्न आणि उत्साही वाटण्यासाठी असायला हवा, असं प्रत्येकालाच वाटू लागलं. त्यातच काहींना आपल्या घरात सोयी करण्यासाठी जागेची कमतरता जाणवू लागली तर काहींना या महागाईच्या जमान्यात स्वतःच्या आवडीप्रमाणे घर सजवणं खर्चिक वाटू लागलं आणि काही मंडळींना तर यातील कुठलीच अडचण नसताना आपण नेमकं कसं कोणत्या पद्धतीने आपलं घर सजवावं, त्याचं स्वरूप काय असावं याचाच गोंधळ मनात सुरू झाला आणि 'इंटेरिअर डिझाइन' ही विशेष संकल्पना सर्वसामान्यांत रुजायला सुरुवात झाली. घराचं 'इंटेरिअर डिझाइन' करून घ्यायचं म्हटलं की, लोकांच्या डोळ्यासमोर मोठ्या खर्चाचे आकडे दिसायला लागतात. पण आपल्या घराचं इंटेरिअर करत असताना खूप पैसे खर्च करूनच ते छान दिसतं असं नाही, तर त्यासाठी आवश्यक असते ती उत्तम, छान गोष्टींची आवड, आवडलेल्या वस्तूंमधून केलेली आपल्या घराला साजेशा वस्तूंची निवड आणि या सर्व वस्तूंची उत्तम मांडणी.

आपल्या प्रत्येकाचं घर, त्याचा लुक तिथे राहणाऱ्या मंडळींचं व्यक्तिमत्त्वच रिफ्लेक्ट करत असतो. घरात वापरलेलं फर्निचर, त्याचा आकार, त्याचा रंग, घरातील भिंतींचा रंग, पडदे, सोफा कव्हर्स, उशांची कव्हर्स यासाठी वापरलेले वेगवेगळ्या टेक्स्चर्सचे कापडाचे प्रकार, घरात मांडलेल्या वेगवेगळ्या शोभेच्या वस्तू, वापरण्यात आलेले लाइटचे पॅटर्न या सर्व घटकांचा एकत्रितपणे सुसंगत असलेला मेळ घराचं सौंदर्य खुलविण्यात परिणामकारक ठरतो. हे सर्व करत असताना कलर, टेक्स्चर्स, लाइट याचा वापर संयमित असायला हवा नाहीतर त्याला शोरूमचा लुक येण्याची शक्यता असते.

माझ्या या स्तंभातून मी आपल्याशी घराच्या अंतर्रचनेपासून ते त्याला लागणाऱ्या रंग, टेक्स्चर्स, लाइट यांसारख्या घटकांपर्यंत, छोट्याशा एक बेडरूमच्या फ्लॅटपासून ते भव्य बंगल्याच्या इंटेरिअरच्या रचनेबद्दल, तर कधी एखाद्या नवीन आकृतीबंधाबद्दल तुमच्याशी संवाद साधणार आहे.

खरं सांगू का घराचं नीटनेटकेपण, प्रसन्नपणा आपण त्यासाठी लागणाऱ्या घटकांच्या मांडणीतून, रचनेतून साधू शकतो. पण तो टिकवण्यासाठी लागते ती नीटनेटकेपणाची आवड, आणि त्या घराचं घरपण टिकवतात ती घरात राहणारी माणसंच. तर मग मंडळी, भेटूया पुढच्या रविवारी याच पानावर!

◆◆◆